होती. पण म्हणून संघकार्य थांबविणे शक्य नव्हते. सरकारी नोकरीत अनेक स्वयंसेवकांना त्रास झालेला पाहिले होते. म्हणून एल्एल्. बी. पूर्ण झाल्यानंतर दुसरी खाजगी नोकरी पाहावयाची असा निर्णय केला. खिरा स्टील वर्क्स या कंपनीकडून मला नोकरीच्या मुलाखतीसाठी बोलाविण्यात आले. मुलाखतीत तुम्ही सरकारी चांगली नोकरी सोडण्याचा विचार का करता असे विचारल्यावर मला रा. स्व. संघाचे काम करावयाचे आहे म्हणून ही नोकरी सोडावयाची आहे असे सांगितले. बाकीचीही चर्चा झाली. ही मुलाखत श्री. एन. एच. अत्रेय (त्यावेळचे ख्यातकीर्त मॅनेजमेंट कन्सलटंट) यांनी घेतली होती. खिरा कंपनीचे मालक श्री. जयानंद खिरा आणि श्री. हिंमतभाई खिरा हे काँग्रेसप्रेमी होते. तरीही माझ्या गुणवत्तेचा विचार करुन माझी निवड करण्यात आली. स्टोअर्स असिस्टंट, अकौन्टस असिस्टंट, अकाऊटंट, कंपनी सेक्रेटरी अशा बढत्या कामाच्या गुणवत्तेच्या आधारावर मला मिळत गेल्या. खिरा स्टील वर्क्स ही स्टील फर्निचर बनविणारी कंपनी त्या काळात गोदरेजच्या नंतरची प्रतिष्ठित कंपनी होती. त्याशिवाय जयानंद खिरा अँड कंपनी ही डबलडेकर बसेस बांधणारी अग्रगण्य कंपनी होती. प्रेशर कुकर्स वगैरे बनविण्यासाठी खिरा अप्लायसेंस कंपनी हीही स्थापन करण्यात आली होती. याशिवाय हिंदुस्थान फॅब्रिक्स प्रा. लिमिटेड या नावाने उत्पादनांची विक्री करणारी चौथी कंपनीही होती. कामातील गुणवत्तेमुळे वर चढत या सर्व कंपन्यांचा कंपनी सेक्रेटरी म्हणून मी काम करीत होतो.

हल्लीच्या भाषेत करियर एकदम मस्त चालली होती. घरीही परिस्थिती बदलत होती. माझ्याप्रमाणेच धाकटा भाऊही स्वयंसेवक. देशकार्यासाठी संघकार्य ही मनोभूमि होती. या भूमिकेत असतानाच सेनादलातील कमिशनसाठी त्याची निवड झाली. आता आई एकटी म्हणून तिला मुंबईत आणून घर थाटण्याचे ठरविले. पुण्यातून माझ्याप्रमाणेच मुंबईला आलेला माझा मित्र श्री. शरद भिडे (ग्राहक मंचचे कार्यकर्ते) याने दिल्लीला जायचे ठरविल्याने तो ज्या चाळीत भाड्याने राहायचा ती जागा घेण्याचे त्याने सुचविले. गोरेगावातील जयप्रकाशनगर मधील हॅपी होम चाळीत मायलेक राहू लागलो. इथे येण्यापूर्वी गोरेगावातच मी एक खोली भाड्याने घेतली होती. पण ती लहान म्हणून हॅपी होम मध्ये आलो. गोरेगावातील संघ स्वयंसेवकांनी स्थापन केलेल्या सन्मित्र मंडळ शिशुवर्गासाठी मी ती जागा दिली. पुढे या शिशुवर्गाची शैक्षणिक संस्था झाली. चार वर्षांपूर्वी या शाळेचा सुवर्ण महोत्सव संपन्न झाला.

गोरेगाव त्यावेळी समाजवादी पक्षाचा बालेकिल्ला मानला जाई. इथे जनसंघाची पणती लावण्यासाठी कै. प्रा. बाळासाहेब उर्फ ग. भा. कानिटकर धडपडत होते. त्यांच्या निवडणुकीच्या निमित्ताने माझी राजकीय कामाला सुरुवात झाली. सहकारी गृहसंस्था हा प्रकार तेव्हा नुकता जन्माला येत होता. मी व स. दि. वैद्य, नागेश वझे अशा संघ स्वयंसेवकांनीच गृहसंस्था उभारली. खिशात पैसे नसताना जिद्दीने उभारलेली ही वास्तू आज 50 वर्षांनंतरही ताठ उभी आहे. एकीकडे सामाजिक-सांस्कृतिक कामेही सुरु केली. आयुष्याला एकाचवेळी स्थिरता व गती होती. तशात कै. उमाकाकूंच्या थोरल्या चिरंजिवांनी त्यांच्या चुलत मेहुणीचे स्थळ सुचविले. जोशी मंडळी माझी हितचिंतक होती. अल्पावधीत नात्यानेही आम्ही जोडले गेलो. स्वातंत्र्यवीर सावरकरांवरील गांधी हत्या संदर्भातील खटल्यात कायदेशीर सहकार्य केलेले व मुंबईतील हिंदु महासभेचे आधारस्तंभ म्हणून ओळखले गेलेले कै. ॲड. का. ना. धारप यांच्या धाकट्या कन्येशी अर्थात कुंदा हिच्याशी 17 मे 1960 रोजी माझा विवाह झाला. वडील गेले असले तरी धारपांचे घराणे मोठे. पैशाने तर अधिकच मोठे. तरीही शिकलेला, निर्व्यसनी मुलगा हवा या दोन्ही अटींची पूर्तता होत असल्याने कुंदाने माझ्या आर्थिक परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन होकार दिला. आम्ही पत्रिका पाहिल्या नव्हत्या. पण विचारांची सुस्पष्टता आणि समाधानी वृत्ती हे दोन गुण नक्की जमले. सुखी व समाधानी गृहस्थाश्रमाची जणू खूणगाठच बांधली गेली.

1962 मध्ये थोरल्या मुलीचा डॉ. निधिगंधाचा, तर 1965 मध्ये धाकट्या मुलीचा विशाखाचा जन्म झाला. चौकोनी कुटुंब, जबाबदारी एकट्या आईची, सुरेख नोकरी, आणखी काय पाहिजे. पण माझा पिंडच वेगळा होता. सतत काम आणि काम करावे, सामाजिक, राजकीय काम तर खूप करावे ही आवड. त्यामुळे दिवसभर नोकरी, रात्री उशिरापर्यंत संघ, जनसंघ अशी धावपळ असे. कुंदा सा-या घराची जबाबदारी सहजतेने पार पाडत असल्याने घरची चिंता तिच्यावर सोडून मी काम करीत राही. कधी गंमतीने ती म्हणे, ''तुमचं बैठकींचं व्यसन मला माहित नव्हतं''.

चाकोरीबद्ध जीवन समाजकार्य करणा-यासाठी नसतेच. 1968 मध्ये पं. दीनदयाळ उपाध्याय यांची हत्या झाली. त्याच सुमारास भारतीय जनसंघाचे मुंबईचे संघटन मंत्री आणि माझे ज्येष्ठ सहकारी श्री. रामदास कळसकर यांना जनसंघाचे काम वाढविण्यासाठी पश्चिम बंगालमधील नक्षलबारी या क्षेत्रामध्ये संघटन मंत्री म्हणून पाठविण्याचा निर्णय झाला. त्यामुळे मुंबईचा संघटन मंत्री कोण असा प्रश्न निर्माण झाला.

मुंबईची राजकीय माहिती असलेला, व्यापार उद्योग क्षेत्राचीही जाण असणारा आणि संघटनात्मक स्तरावर सक्रिय कार्यकर्ता म्हणून मी मुंबईचा संघटन मंत्री म्हणून काम करावे असा विचार जनसंघाचे प्रदेश संघटन मंत्री श्री. वसंतराव भागवत आणि मुंबई जनसंघाचे अध्यक्ष श्री. झमटमल वाधवानी, सरचिटणीस प्रा. बाळासाहेब कानिटकर, श्री. वामनराव परब आदी नेत्यांनी केला. श्री. रामदास कळसकर आणि मी पुण्यापासून म्हणजे 1952 पासून एकमेकांचे मित्र असल्यामुळे श्री. कळसकरांनीही खूप आग्रह केला. माझा विवाह झालेला आहे. मला दोन मुली आहेत. माझ्या संसाराची आर्थिक बाजू मीच सांभाळत आहे. माझ्याकडे वडिलोपार्जित जमीन, घर अन्य स्थावर संपत्ती काहीही नाही अशी परिस्थिती असल्यामुळे काम करण्याची इच्छा तर आहे, परंतु आर्थिक अडचणीमुळे मी संघटन मंत्री होऊ शकणार नाही असे मी सांगितले. तथापि आर्थिक जबाबदारी संघटना घेईल तुम्ही त्याची चिंता करु नका असे मला सर्वांनी सांगितले. या विषयाबाबत मी माझी